Publication: Punyanagari
Date: 12/3/2020
Page: 1
Column: 1

पुण्य नगरी

गुरुवार
१२ मार्च २०२०

# अदानी इलेक्ट्रीसिटीकडून सुरक्षा सप्ताह

**मुंबई :** अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेडने आयोजित केलेल्या सुरक्षा सप्ताहाचा समारोप करण्यात आला. एन्हान्स हेल्थ ॲण्ड सेफ्टी परपॉर्मन्स बाय यूज ऑप ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी हा विषय घेऊन राष्ट्रीय सुरक्षितता परिषद सुरू करण्यात आली होती. एईएमएलच्या सेफ्टी टीमने ४९ व्या नॅशनल सेफ्टी वीक २०२० कार्यक्रमादरम्यान बैल बाजार, कुर्ला येथे राहणाऱ्या ग्राहकांच्या घरी व परिसरात विजेच्या सावधगिरीबाबत शैक्षणिक जागृती सत्र आयोजित केले. ११ मार्चपर्यंत चाललेल्या या सुरक्षा सप्ताहात अदानी इलेक्ट्रीसिटीने आपल्या वितरण क्षेत्रातील ग्राहकांना विद्युत सुरक्षितता उपायांबाबत शिक्षण दिले. संपूर्ण आठवडाभर शिक्षण मोहिमेचे आयोजन केले होते. मानवी आयुष्याच्या संरक्षणात निर्णायक महत्त्वाच्या प्रतिबंधात्मक उपायांबाबत सर्व वयोगटांतील नागरिकांना माहिती देण्यात आली.